| MHPU230014462010 | दाखल दिनांक | : | २२/१२/२०१० | | |
|---|---|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | : | २२/१२/२०१० | | |
| | निकाली दिनांक | : | ०२/०७/२०२६ | | |
| | कालावधी | : | व. | म. | दि. |
| | | | १५ | ०६ | १० |

**खेड–राजगुरूनगर येथील न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, ता.खेड, जि.पुणे यांचे न्यायालयात**

समोर : पिठासीन अधिकारी

**अ.ज. गिऱ्हे**

**न्यायनिर्णय घोषित दिनांक ०२ जुलै, २०२६**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.५९४/२०१०**

**(सदर खटला नियमित फौजदार खटल्याप्रमाणे चालविण्यात आला.)**

**निशाणी क्र.**

**गुन्हा नोंदणी क्रमांक ४५/२०१०**

| | | |
|---|---|---|
| अभियोगपक्ष | | महाराष्ट्र शासन तर्फे ठाणे अंमलदार, **आळंदी** पोलिस ठाणे, ता.खेड, जि.पुणे. |
| प्रतिनिधित्व | | श्री.व्ही. एस. डोळस. सहाय्यक सरकारी अभियोक्ता |
| आरोपी | | **१.संतोष नामदेव वाबळे,**<br>वयः–४७ वर्षे,<br>**२. शिलन संतोष वाबळे,**<br>वयः– ४५ वर्षे,<br>**३. कलावती बाळू वाबळे,** |

| | | |
|---|---|---|
| | | वयः– ५५ वर्षे,<br>**४. अलका महादेव वाबळे,**<br>वयः– ५५ वर्षे,<br>सर्व रा.,गोलेगाव, ता. खेड, जि. पुणे. |
| प्रतिनिधित्व | | श्री. एस. एम. सांडभोर, आरोपींतर्फे विधिज्ञ |

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेला दिनांक | ०१/१०/२०१० |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | ०१/१०/२०१० |
| दोषारोपपत्र दिनांक | ०६/१०/२०१० |
| दोषारोप ठेवलेला दिनांक | १२/०८/२०१३ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | २३/१०/२०१७ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवलेला दिनांक | ०२/०७/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | ०२/०७/२०२६ |
| आदेश कोणता | आरोपींना निर्दोष मुक्त केले. |

| क्र. | आरोपीचे नाव | आरोपीस अटक केलेला दिनांक | आरोपीस जामीनावर सोडल्याचा दिनांक | आरोपीवर ठेवलेले गुन्हे | आरोपीस निर्दोष अथवा शिक्षा | आरोपीस देण्यात आलेली शिक्षा | भा.ना.सु.सं.क. ४६७ अन्वयेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | संतोष नामदेव वाबळे | ०८/११/२०१० | --- | भा.दं.वि. ३५४, ३२३, ५०४, ५०६ अन्वये | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात आले. | -- | -- |
| २ | शिलन संतोष वाबळे | ०८/११/२०१० | --- | भा.दं.वि. ३५४, ३२३, ५०४, ५०६ अन्वये | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात आले. | -- | -- |
| ३ | कलावती बाळू वाबळे | ०८/११/२०१० | --- | भा.दं.वि. , ३५४ ,३२३, ५०४, | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात | -- | -- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ५०६ अन्वये | आले. | | |
| ४ | अलका महादेव वाबळे | ०८/११/२०१० | --- | भा.दं.वि. ३५४, ३२३, ५०४, ५०६ अन्वये | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात आले. | -- | -- |

**अ. अभियोगपक्ष :**

| क्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| अ. साक्षीदार क्र-१ | राजश्री मच्छींद्र गाडेकर | तक्रारदार |

**ब. आरोपीचे बचावाचे साक्षीदार :**

| क्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| - | -- | -- |

**क. न्यायालयीन साक्षीदार :**

| क्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**ड. महत्वाची वस्तू**

| अ..क्र. | महत्वाची वस्तु क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १. | अ | तक्रारदारचा ब्लाउज |

**न्या य नि र्ण य**

**(घोषीत दिनांक ०२/०७/२०२६)**

आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता कलम **३५४, ३२३, ५०४, ५०६** सह कलम ३४ अन्वये दोषारोप ठेवून खटला चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाच्या खटल्याची हकिकत थोडक्यात पुढीलप्रमाणे –**

२. तक्रारदार राजश्री मच्छींद्र गाडेकर रा.गोलेगांव ता. खेड येथे राहत असून त्यांचा भाऊ आनंद याने दि.१६/०८/२०१० रोजी बाळु वाबळे यांची मुलगी

कोमल हिच्यासोबत पुणे येथील न्यायालयामध्ये नोंदणीकृतरित्या प्रेमविवाह केला. त्यास बाळु वाबळे यांचा विरोध होता. या कारणावरुन चिडून जावून बाळु वाबळे याने आनंद यास दि.०१/१०/२०१० रोजी गोलेगाव येथे रस्त्यात आडवून मारहाण केली. त्याबाबत तक्रारदारने आळंदी पोलीस ठाण्यात तक्रार दिली. तक्रार देवून घरी जात असताना आरोपींनी त्यांचा रस्ता आडवून 'आमच्याविरुध्द तक्रार देतेस का' तुझा माजच उतरवतो' असे म्हणून त्याने तक्रारदारची छाती पिळगाळली. त्याच्या सोबत असलेल्या इतर आरोपी ओरडून म्हणाल्या की, मादरचोद आनंद कानडे यास तुम्ही मारहाण करा, त्याप्रमाणे सर्व आरोपी त्यांच्या भावास मारहाण करत होते त्यावेळी भांडण सोडविण्यासाठी त्या गेल्या असता आरोपींनी तिच्या अंगावरील कपडे फाटेपर्यंत मारहाण केली व तिच्या स्त्रीमनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. त्यामुळे तक्रारदाराने आळंदी पोलीस ठाण्यात आरोपींविरुध्द तक्रार दिली.

३. सदर तक्रारीवरुन आळंदी पोलिस ठाणे गु.र.नं.४५/२०१० भारतीय दंड संहिता कलम ३५४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. प्रस्तुत गुन्हयाचा तपास करण्याबाबत पो.हे. श्री. एन. आर. साळूंके यांना आदेशित करण्यात आले. त्यांनी गुन्हयाचा तपास केला. तपासादरम्यान त्यांनी घटना स्थळाचा पंचनामा केला, साक्षीदाराचे जबाब नोंदविले. घटनास्थळावरील एक ब्लाउज जप्त केला. मुद्देमाल पावती तयार केली. आरोपींविरुध्द पुरावा मिळवून आल्याने त्यांनी आरोपींविरुध्द दोषारोपपत्र पाठविले.

४. आरोपी न्यायालयात हजर झाल्यानंतर माझे पुर्वन्यायीक अधिकारी यांनी सुरुवातीला त्यांना संक्षिप्त पध्दतीने खटला चालविण्याची अधिकारता नसल्याने त्यांनी आरोपींविरुध्द दोषारोपाचा तपशील नि.क्र.११ कडे निश्चीत केला. परंतु, त्यानंतरचे न्यायीक अधिकारी यांनी भा.द.वि. कलम ३५४ अन्वयेच्या गुन्हयास २ वर्षांपेक्षा जास्त कारावासाची शिक्षा असल्याने खटला नियमीत खटला म्हणून चालविणे आवश्यक असल्याने त्यांनी आरोपींविरुध्द **नि.क्र.२८** कडे दोषारोप निश्चीत केला. आरोपींनी गुन्हा नाकबुल करुन खटल्याचे पुढील संपरीक्षा करण्याची

मागणी केली. वेळोवेळी साक्षीदारांना समन्स व वॉरंट पाठविण्यात आले परंतु साक्षीदार मिळून आलेले नाहीत. तसेच आरोपी प्रत्येक तारखेस न्यायालयात हजर राहत असल्याने व जलद संपरिक्षा हा देखील आरोपींचा घटनात्मक अधिकार असल्याने माझे पुर्व न्यायीक अधिकारी यांनी अभियोग पक्षाचा पुरावा बंद केला. आरोपींविरुध्द परिस्थितीविशेष खुलासा करण्याइतपत पुरावा अभिलेखावर आल्याने आरोपींचा फौ.प्र.सं.कलम ३१३(१) ब अन्वयेचा बयान नोंदविण्यात आला. आरोपींनी त्यांचेविरुध्द खोटी केस केली असल्याचा बचाव घेतला. आरोपींनी बचावासाठी पुरावा दिलेला नाही.

५. अभियोग पक्षाकरीता श्री. व्ही. एस. डोळस, सहा. सरकारी अभियोक्ता व आरोपीकरीता विधीज्ञ श्री. एस.एम. सांडभोर यांचा युक्तीवाद ऐकला. आरोपीवरील दोषारोप, अभियोगपक्षाचा पुरावा यावरुन खटल्याच्या विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित झाले. सदरच्या मुद्दयांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविण्यात आले.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष हे शाबीत करतो काय की, दि.०१/१०/२०१० रोजी १९.३० वाजण्याच्या सुमारास मौजे गोलेगाव, ता. खेड, येथे आरोपी क्र.१ याने तक्रारदाराचे कपडे फाटेपर्यंत हाताने मारहाण करुन तिची छाती पिरगाळून तिच्या स्त्रीमनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले? | ..नाही |
| २. | अभियोगपक्ष हे शाबीत करतो काय की, उपरोक्त वेळी दिवशी व ठिकाणी आरोपींनी संगनमताने तक्रारदारास व त्यांच्या भावास लाथाबुक्यांनी मारहाण करुन जखमी केले ? | ..नाही |

| | | |
|---|---|---|
| ३. | अभियोगपक्ष हे शाबीत करतो काय की, उपरोक्त वेळी दिवशी व ठिकाणी आरोपींनी संगनमताने तक्रारदार व तिच्या भावास शिवीगाळ करुन अपमानित केले व सार्वजनिक शांततेचा भंग होण्यास प्रक्षोभित केले ? | ..नाही |
| ४. | अभियोगपक्ष हे शाबीत करतो काय की, उपरोक्त नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमताने तक्रारदारास व तिच्या भावास जिवे ठार मारण्याची धमकी दिली व फौजदारीपात्र धाकटपशा केला ? | नाही. |
| ५. | आदेश काय ? | आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात आले. |

## <u>कारणमिमांसा</u>

### <u>मुद्दे क्र.१ ते ५ करीता</u>

६. सर्व मुद्दे एकाच घटनेशी संलग्न असल्याने कथनांची पुनरावृत्ती टाळण्याकरिता एकत्र विचारात घेण्यात आले. फौजदारी न्याय तत्व शास्त्राप्रमाणे आरोपीवरील दोषारोप शाबीतीची जबाबदारी ही अभियोगपक्षावर आहे. तसेच अभियोग पक्षाने घटनेदिवशी आरोपींनी संगणमताने तक्रारदाराचे कपडे फाटेपर्यंत हाताने मारहाण करुन तिची छाती पिरगाळून तिच्या स्त्रीमनास लज्ञा उत्पन्न होईल असे कृत्य केले, तसेच तिला व तिच्या भावास लाथाबुक्यांनी मारहाण करुन, शिवीगाळ करुन अपमानित केले व शांतताभंग होण्यास प्रक्षोभित केले तसेच जिवे ठार मारण्याची धमकी दिली हे निसंशयकरित्या शाबीत करणे आवश्यक आहे.

७. तक्रारदार सा.क्र.१ राजश्री मच्छींद्र गाडेकर यांनी त्यांच्या पुराव्यात सांगितले की, त्यांचा भाऊ आनंद याचा प्रेम विवाह आरोपी क्र.३ च्या मुलीसोबत

दि.१६. ०८.२०१० रोजी झाला होता. आरोपींना सदरचे लग्न मान्य नव्हते. त्यामुळे आरोपींनी दि.०१.१०.२०१० रोजी त्यांचा भाऊ आनंद यास मारहाण केली होती. त्यामुळे त्यांनी त्यांच्या सोबत जाऊन आळंदी पोलिस स्टेशन येथे फिर्याद दिली होती. तेथुन परत येत असताना आरोपी क्र.१ यांने त्यांना का तक्रार दिली, तुझा माज जिरवतो असे म्हणून दमदाटी करुन इतर आरोपींनी त्यांचे कपडे फाटे पर्यंत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली त्यानंतर आरोपी क्र.१ संतोष याने त्यांना रेटत मागे नेले व त्यांची छाती दाबली. त्यानंतर आरोपी तेथुन निघुन गेले. त्यानंतर परत त्या त्यांच्या भावाला घेउन आळंदी पोलिस स्टेशन येथे गेल्या. तेथे पोलिसांनी त्यांची तकार नोंदवुन घेतली नाही. त्यानंतर त्या दररोज असे ३ ते ४ वेळा पोलिस स्टेशनला तक्रार नोंदविण्यासाठी गेले परंतु तरी सुद्धा पोलिसांनी तकार नोंदवुन घेतली नव्हती. त्यानंतर त्या सन २०१० पासुन सामाजिक कार्य करते. त्यामुळे सदरची बाब त्यांनी लोक–जनशक्ती पार्टीचे अध्यक्ष अशोक कोंडीबा कांबळे यांना सांगितली होती. त्यांनी पोलिस अधिक्षक, पुणे यांना निवेदन दिल्यानंतर आळंदी पोलिसांनी त्यांची तक्रार नि.क्र. ३४ अन्वये नोंदवुन घेतली.

८. अभियोग पक्ष इतर साक्षीदार तपासण्यास व त्यांना साक्षीकामी हजर ठेवण्यास असमर्थ ठरल्याने अभियोग पक्षाने मुख्यत्वेकरुन तक्रारदार सा.क्र.१ यांच्या पुराव्यावर खटल्याची भिस्त ठेवलेली आहे. त्यांनी अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे पुरावा दिलेला आहे. आरोपींनी त्यांचा पुरावा खाडून काढण्याकरीता तक्रारदाराच्या उलटतपासाचा आधार घेतलेला आहे.

९. तक्रारदार यांनी उलटतपासात मान्य केलेले आहे की, त्यांनी आरोपी कैलास विरुध्द या न्यायालयात विनयभंगाचा खटला दाखल केला आहे. तसेच फौ.ख.क्र.२०२/२०११ हे विनयभंगाचे प्रकरण देखील या न्यायालयात प्रलंबित आहे. त्यांचे व त्यांच्या भावाविरोधात प्रस्तुत आ.क्र.१ यांचा भाऊ बाळु याचा खुनाचा खटला खेड न्यायालयात सुरु आहे. दि. ०१/१०/२०१० रोजी त्यांचा

भाऊ आनंद याला झालेल्या मारहाणीत त्याच्या डोक्याला कोच पडली होती व त्यामुळे तशी तक्रार देण्यासाठी ते पोलीस ठाण्यात गेले होते. त्यांच्या भावाला दवाखान्यात नेले होते किंवा नाही तसेच त्यांच्या भावावर उपचार केले अथवा कसे याबाबत त्यांना आठवत नाही, माहिती नाही. त्यांना मारहाणीमध्ये अंगावर वळ उमटलेबाबत वैद्यकीय प्रमाणपत्र त्यांच्याकडे नाही. वनमाला शिंदे या सामाजिक कार्यकत्या त्यांच्यासोबत पोलीस ठाण्याला आल्या होत्या.

१०. सा.क्र.१ तक्रारदार यांनी दिलेला पुरावा तसेच त्यांनी उलटतपासात मान्य केलेल्या बाबी पाहता त्यांच्या पुराव्याचे सुक्ष्म पृथःकरण करणे आवश्यक ठरते. तसेच प्रस्तुत घटनेस इतर एकही स्वतंत्र प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नसल्याने देखील तक्रारदाराचा पुरावा सुक्ष्मपणे तपासणे आवश्यक ठरते. घटना दि.०१/१०/२०१० रोजी घडली असून तक्रार दि.०६/१०/२०१० रोजी देण्यात आलेली आहे. तक्रार देण्यास जवळपास ५ दिवसांचा उशिर झालेला आहे. सदर बाबत तक्रारदार हिने पोलीसांनी तिची तक्रार लिहून घेतली नव्हती, वारंवार विनंती करुनही पोलीसांनी तक्रार घेतली नाही व त्यामुळे लोकजनशक्ती पार्टीचे अध्यक्ष अशोक कांबळे यांच्यासह जावून पोलीस अधिक्षक यांना निवेदन दिल्यानंतर त्यावरुन आळंदी पोलीसांनी त्यांची तक्रार नोंदवून घेतली असे स्पष्टीकरण दिलेले आहे. परंतु, सदर स्पष्टीकरण ग्राहय धरणे उचित ठरणार नाही. कारण पोलीसांनी त्यांची तक्रार घेतली नाही याबाबत त्यांनी कोठेही तक्रार केल्याचे दिसून येत नाही. सदर बाबत लोकजनशक्ती पार्टीचे अध्यक्ष अशोक कांबळे यांना तपासण्यात आलेले नाही. पोलीस अधिक्षक यांना सदर बाबत निवेदन दिल्याची प्रत अभिलेखावर नाही व तसे शाबीतही झालेले नाही. याशिवाय, ते वेळोवेळी पोलीस स्टेशनला तक्रार देण्यासाठी गेले तरीदेखील पोलीसांनी त्यांची तक्रार घेतली नाही याबाबतदेखील त्यांनी कोणताही पुरावा दिलेला नाही. याशिवाय त्यांनी लेखी तक्रार देण्याचा प्रयत्न केला याबाबत देखील पुरावा दिलेला नाही. पोलीस अधिक्षक यांना निवेदन दिल्यानंतर प्रस्तुत तक्रार नोंदवून घेतलयाचे तक्रार नि.क्र.३४ वरुन दिसून येत नाही. त्यामुळे सदर बाबत दिलेले स्पष्टीकरण ग्राहय धरता येणार नाहीत. तसेच सदर सहा

दिवसांचा विलंब तक्रारीस मजबुती देण्याकरता झाला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे, सदर ६ दिवसांचा विलंब अभियोग पक्षाच्या खटल्यास परिणामकारक ठरत आहे.

११. अभियोग पक्षाच्या कथनानुसार घटना दि.०१/१०/२०१० रोजी घडली. आरोपीने तक्रारदारास लाथाबुक्यांनी मारहाण केली, तिला रेटत नेले, छाती दाबली, तिचा ब्लाऊज फाडला व अंगावर वळ उमटेपर्यंत मारहाण केली व तिच्या खांद्यावर, छातीवर व मांडीवर वळ उमटले होते. तसेच तिच्या भावाला मार लागला होता. एवढा मार लागूनही तक्रारदार दवाखान्यात गेलेली नाही व तिच्या जखमांबाबत कोणतेही वैद्यकीय प्रमाणपत्र अभिलेखावर नाही व जखमा शाबीत नाही. याशिवाय तिचा भाऊ आनंद याच्या मारहाणीबाबतदेखील वैद्यकीय प्रमाणपत्र अभिलेखावर नाही. तक्रारदाराने तिच्या वैद्यकीय प्रमाणपत्र नसल्याचे स्पष्ट मान्य केलेले आहे. सबब,तक्रारदार व तिचा भाऊ यांना झालेल्या जखमांबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर न आल्याने सदर बाबतची अभियोग पक्षाची कथने ग्राहय धरता येणार नाहीत.

१२. तक्रारदार हिने पोलीस अधिक्षक यांच्यासमोर निवेदन दिल्यानंतर तक्रार नोंदविल्याचे सांगितले आहे. सरतपासात सांगितलेल्या बाबी तिच्या पोलीस जबाबात का नमुद नाही याचे कारण त्यांना सांगता येत नाही. याशिवाय त्या भांडण सोडविण्यासाठी गेलया असता त्या त्यांच्या भावाच्या अंगावर पडल्या, त्यावेळी आरोपी संतोष याने त्यांना फरफटत मागे आणले होते व त्यांना मारहाण केली होती याबाबी त्यांच्या बयानात का नमुद नाही याची कारणे त्यांना सांगत येत नाहीत.यावरुन तक्रारदार यांनी न्यायालयासमोर पुरावा देताना जादाची कथने केल्याचे दिसून येत आहे. सदर जादाची कथने अभियोग पक्षांच्या कथनांची विसंतग असल्याने व त्यास इतर साक्षीदारांकरवी पुष्टी न मिळाल्याने सदर कथने तक्रारदार यांनी मान्य केलेल्या बाबींच्या अनुषंगाने ग्राहय धरणे न्यायोचित ठरणार नाही.

१३. याशिवाय, तक्रारदार यांनी १६/०८/२०१० ते ०१/१०/२०१० या कालावधीतमध्ये त्यांच्यात व आरोपींमध्ये कोणतेही वाद झाले नव्हते ही बाब स्पष्टपणे मान्य केलेली आहे. याशिवाय त्यांनी त्यांच्या भावाला दवाखान्यात नेले होते किंवा कसे हे आठवत नाही, त्यांचा भावावर उपचार केलयाचे त्यांना माहित नाही अशी कथने केलेली आहेत. दि.०६/१०/२०१० रोजी फाटलेला ब्लाऊज पोलीसांना द्यावा लागतो हे माहित नसल्याने दिला नव्हता असे कथन केले आहे. पोलीसांनी ७/१०/२०१० रोजी म्हणजेच घटनेच्या १० दिवसांनंतर घटनेतील फाटलेला ब्लाऊज तक्रारदाराने दिल्यावरुन जप्त केला आहे परंतु घटनेनंतर सदर ब्लाऊज ७ दिवसांकरीता तक्रारदाराच्यात ताब्यात राहिल्याने सदर ब्लाऊज आरोपीनेच फाडलेला ब्लाऊज आहे किंवा कसे याबाबत साशंकता निर्माण होत आहे.

१४. तक्रारदाराने तिचा भाऊ आनंद तसेच अशोक कांबळे यांनादेखील साक्षीकामी न्यायालयासमोर हजर केलेले नाही. तक्रारदार हिने तीन ते चार व्यक्तींच्या विरोधात विनयभंगाचे खटले दाखल केले आहेत हे आरोपींनी सुचित केलेले विधान तक्रारदार हिने नाकारलेले असले तरी तिने आरोपी कैलास लोखंडे विरुध्द विनयभंगाचा खटला केलयाचे स्पष्ट मान्य केले आहे. तसेच फौ.ख.क्र. २०१/२०११ हा देखील विनयभंगाच्या गुन्याकरीता न्यायालयात प्रलंबित असल्याचे मान्य केलेले आहे. एका बाजुला तक्रारदार विनयभंगाचे खटले दाखल केल्याची बाब नाकारते व दुसरीकडे सदर बाबी मान्य करते यावरुन तक्रारदार यांची वर्तणुक दिसून येत आहे.

१५. याशिवाय, तक्रारदाराने जरी आरोपींविरुध्द घटनेबाबत सांगितले असले तरी तिने स्पष्ट मान्य केले आहे की, तिचे व तिच्या भावाच्या विरोधात या खटल्यातील आ.क.१चा भाऊ बाळु याच्या खुनाचा खटला खेड न्यायालयात प्रलंबित आहे. सदर मान्य बाब पाहता आरोपींनी घेतलेला बचाव की, आ.क्र.३ च्या

मुलीसोबत तक्रारदाराच्या भावाने लग्न केल्याने व सदर बाब मान्य नसल्याने त्या वादातून प्रस्तुत तक्रार दाखल झाली असल्याचे शक्यता नाकारता येत नाही. याशिवाय, तिच्या भावाच्या विरोधात अतुल चौधरी याला मारहाण केल्याच खटला या शिवाय तिचे व तिच्या भावाच्या विरोधात गंगावणे यांना मारहाण केल्याचे पत्र चालू असल्याचे तिला माहित नसल्याचे कथन केले आहे. यावरुनदेखील तक्रारदाराची वर्तणुक दिसून येत आहे.

१६. तक्रारदाराने आ.क्र.१ संतोष याने तिचा विनयभंग केल्याचे सांगितले असले तरीही सदर बाबीस स्वंतत्र साक्षीदाराकरवी पुष्टी मिळालेली नाही. त्यामुळे तक्रारदार आरोपीविरुध्द का सांगत आहे याबाबत प्रश्न उपस्थित होत आहे. सदर अनुषंगाने तक्रारदार हिने तिचे व तिच्या भावाविरुध्द आ.क्र.१ च्या भावाचा खून केल्याच खटला प्रलंबित असल्याचे स्पष्ट मान्य केलेले आहे.त्यामुळे सदर खटल्यास शह देण्या करता प्रस्तुतची तक्रार दाखल केली असल्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब, उक्त परिस्थितीमध्ये तक्रारदाराचा पुरावा आहे तसा ग्राहयधरणे न्यायोचित ठरणार नाही.सबब, आरोपीने तक्रारदाराचा विनयभंग केला, तिला मारहाण केली, तिच्या भावाला मारहाण केली याबाबी निसंशयरित्या शाबीत होत नाही.

१७. अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे आरोपींनी तक्रारदार व तिच्या भावास शिवीगाळ व जिवे मारण्याची धमकी दिली. परंतु भा.द.सं.कलम ५०४ व ५०६ अन्वयेचे दोषारोप शाबीत करण्यासाठी आरोपींनी तक्रारदारास दिलेल्या शिवीगाळचे शब्द जसेच्या तसे पुराव्यात येणे व ते शाबीत होणेही आवश्यक असते. याशिवाय आरोपींनी धमकाविल्यामुळे तक्रारदार व साक्षीदार यांच्या मनात भिती निर्माण झाली या बाबतदेखील पुरावा अभिलेखावर येणे आवश्यक आहे. परंतु, आरोपींनी शिवीगाळ केली याबाबत तक्रारदार यांनी त्यांच्या पुराव्यात काहीही सांगितलेले नाहीत. तसेच आरोपींनी धमकावल्याबाबतही अभिलेखावर पुरावा आलेला नाही. सदर बाबी शाबीत

न झाल्याने भा.द.सं.कलम ५०४ व ५०६ अन्वयेचा गुन्हा देखील अभिलेखावरील पुराव्या अभावी शाबीत होत नाही.

१८. प्रस्तुत खटल्यातील जप्त मुद्देमाल एक ब्लाऊज हे किंमत शुन्य असल्याने फौजदारी प्र.सं.क. ४५२ अन्वये अपील कालावधीनंतर नाश करण्याबाबत आदेश करणे उचित होईल.

१९. उपरोक्त विवेचनावरुन अभियोग पक्ष आरोपीवरील दोषारोप सिध्द होणे इतपत पुरावा अभिलेखावर आणणेस असमर्थ ठरल्याने आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतात. सबब मी मुद्दा क्रमांक १ ते ४ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविला आहे व मुद्दा क्र. ५ करिता खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

## आदेश

१. आरोपी क्र.**१.संतोष नामदेव वाबळे, २. शिलन संतोष वाबळे, ३. कलावती बाळू वाबळे व ४. अलका महादेव वाबळे,** यांची भारतीय दंड संहिता कलम ३५४, ३२३,५०४,५०६ सह कलम ३४ अन्वये च्या शिक्षापात्र अपराधातून फौ.प्र.सं.क.२५५ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचे वैयक्तिक बंधपत्र व जामीन कदबे याद्वारे रद्द करण्यात येत आहेत.

३. जप्त मुद्देमाल एक ब्लाऊज हा किंमत शुन्य असल्याने अपिल कालावधीनंतर फौजदारी प्र.सं.क. ४५२अन्वये नाश करावा.

४. आरोपींनी फौ.प्र.सं.क.४३७(अ) अन्वये रुपये ५,०००/- चा प्रत्येकी वैयक्तीक बंदपत्र व जामीन कदबा दयावा.

न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.

GIRHE ANNASAHEB JAGANNATH
Digitally signed by GIRHE ANNASAHEB JAGANNATH
Date: 2026.07.02 17:55:40 +0530

दिनांक - ०२/०७/२०२६ **( अ. ज. गिऱ्हे )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खेड-राजगुरुनगर.

| **CERTIFICATE** | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. file Order/Judgment is same word for the word as per original Order/Judgment. | | |
| Name of Steno | :- | Y.P. Ambure, Steno (Grade-3) |
| Court Name | :- | A. J. Girhe<br>Jt. CJJD & JMFC,<br>Khed-Rajgurunagar, Pune |
| Date of Order/Judgment | :- | 02/07/2026 |
| Signed by PO on | :- | 02/07/2026 |
| PDF uploaded on | :- | 02/07/2026 |